नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १३२ Issue - 132 | वार - बुधवार दि. ७ ऑक्टोबर २०२६ Blow- Wednesday Date 7 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## प्रत्येक जिल्ह्याला नवीन १ हजार ट्रान्सफार्मर मंजूर

### अखंडित वीजपुरवठा; दुष्काळात शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला मोठा दिलासा देणारा अभूतपूर्व निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी आज मंजुरी दिली. या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाचे कामे युद्धपातळीवर सुरु होणार आहेत.

यंदाच्या कमी पर्जन्यमानामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षमतेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य शासनाने मंजूर केलेल्या विशेष निधीच्या माध्यमातून तीन महत्वाचे कामे तातडीने करण्यात येणार आहेत. यामध्ये आवश्यकतेनुसार नवीन वितरण रोहित्रांची (ट्रान्सफॉर्मर्स) खरेदी केली जाईल. त्याद्वारे अतिभारित (ओव्हरलोड) किंवा नादुरुस्त रोहित्र बदलून सिंचनातील अडथळे दूर करण्यात येतील. यासोबतच कृषी वीजवाहिनीवर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना आणि शेतातील घरांना २४ तास सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार सिंगल फेज आणि थ्री-फेजचे नवीन 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' (एसडीटी) खरेदी करून ते बसवले जाणार आहेत. तसेच लांब अंतराच्या वीजवाहिन्यांवर कमी दाबाने (लो-व्होल्टेज) वीजपुरवठा होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी मात करून योग्य दाबाने व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँकेची खरेदी करण्यात येणार आहेत. वीजयंत्रणेच्या या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी व्हावी यासाठी महावितरणच्या संबंधित अधीक्षक अभियंता कार्यालयामार्फत सर्व तांत्रिक बाबींची तात्काळ तपासणी केली जाणार आहे. वीजयंत्रणेच्या स्थानिक गरजांनुसार आवश्यक अंदाजपत्रके तयार करून ती तत्परतेने संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.

दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान टळावे आणि पिकांना वेळेवर पाणी देता यावे यासाठी या अंदाजपत्रकांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तातडीने प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाईल. या कामांच्या मान्यतेचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच या योजनेअंतर्गत मंजूर व वितरित निधीच्या विनियोगाचा अहवाल महावितरणच्या अधीक्षक अभियंता कार्यालयाकडून विहित कालावधीत जिल्हाधिकाऱ्यांना सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या या धोरणात्मक व धडाडीच्या निर्णयामुळे दुष्काळाच्या सावटाखाली असलेल्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील महावितरणच्या वीजयंत्रणेला देखील नवी ताकद मिळणार आहे.

## संविधानाला हातात घेऊन संविधान नाकारण्याचा प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताच्या संविधानाने तयार केलेल्या सर्व संस्था कुचकामी आहेत हे रुजवण्याचं काम आहे. त्यानंतर ते सांगतील की संविधान तुम्हाला न्याय देऊ शकत नाही. म्हणून संविधान हातात घेऊन काम सुरु आहे, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सध्या सुरू असलेल्या राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या राहुल गांधींच्या आंदोलनावर भाष्य केलं. मुंबई पोलिस हे प्रोफेशनली आहेत, ते कुणावरही चुकीची कारवाई करत नाहीत. अदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य केल्या आहेत, त्या मागण्या मी मान्य केल्यानंतर त्यांनी मझं अभिनंदन केलं. मात्र, आपल्या लिडरशिपसाठी ह्या विद्यार्थ्यांचा वापर केला जातोय, असे म्हणत फडणवीसांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचं राजकारण होत असल्याकडे लक्ष वेधले.

भारतातील सगळ्या लोकशाही संस्था संपवा, असं एक्स्ट्रीम लेव्हलला होत आहे. विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदुक ठेऊन आपलं राजकारण केलं जातंय. राज्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांचे सगळे प्रश्न सोडवण्यासाठी निर्णय घेतले आहेत. राज्य सरकार पूर्णपणे सकारात्मक आहे. राजकारणाला उत्तर राजकारण असंच राहिल, असेही फडणवीसांनी स्पष्ट केले.

चझडउ च्या अध्यक्षांचा राजीनामा घेणं किंवा त्यांना



**राजधानी दिल्लीत सुरू असलेल्या राहुल गांधींच्या आंदोलनावर सीएम फडणवीस यांचे भाष्य**

हटवणं हे राज्य सरकारच्या हातामध्ये नाही. राष्ट्रपतींना सुप्रीम कोर्टाच्या शिफारसींवरुनच त्यांना हटवता येतं, हे संविधानात लिहिलेलं आहे. दुसरं म्हणजे, एमपीएससीचे विद्यमान अध्यक्ष हे जेव्हा पेपर फुटला त्यावेळी अध्यक्ष नव्हते. मात्र, त्यांच्यावर कारवाई करा अशी मागणी करणं कितपत योग्य आहे याचाही विचार झाला पाहिजे. तरीही विद्यार्थ्यांच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी आम्ही आयोगातील आजी-माजी अध्यक्षांची चौकशी करायला सांगितलं आहे. त्यामध्ये, आर्टीकल ३१७ प्रमाणे जर ते दोषी असतील तर आम्ही राष्ट्रपतींपडे शिफारस करू, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. राज्यपाल महोदयांकडे ही विनंती काल सरकारने केली आहे, अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

दुष्काळ संदर्भात चर्चा झाली असून पिण्याच्या पाण्यासाठी पहिल्यांदा प्रायोरीटी द्यावी असे ठरले. राज्यातील २३ हजार गावांचा सर्व्हे झाला आहे, ११ तारखेला केंद्राकडून समिती येईल. केंद्राकडून पैसे, मदत लवकर मिळवण्याचा प्रयत्न आहे, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दुष्काळाच्या परिस्थितीसंदर्भाने बोलताना दिली.

कोल्हापुर गोकुळ दुध संघाच्या निवडणुकासंदर्भात महायुती एकत्र लढेल, आता हसन मुश्रीफ नेतृत्व करत आहेत, त्यांच्या नेतृत्त्वात निवडणूक लढवली जाईल. माझ्या पातळीवर काहीही निर्णय होणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी गोकुळ संदर्भाने स्पष्ट केले.

## स्मृती मंधाना महिला संघाची कर्णधार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार खेळाडू आणि माजी विश्वचषक विजेती कर्णधार हरमनप्रीत कौरने कर्णधारपदाची जबाबदारी सोडण्याचा निर्णय घेतला होता. तिने, भारतीय महिला संघाच्या सर्व फॉरमॅटमधील कर्णधारपदाची जबाबदारी सोडण्याचा निर्णय घेतला होता. आता तिच्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाला नवीन कर्णधार मिळाली आहे. आतापासून भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार स्मृती मंधाना झाली आहे.

महिला क्रिकेट संघाची नवी कर्णधार कोण याची चर्चा क्रिकेट चाहत्यांमध्ये सुरु होती, अखेर याचं उत्तर भारतीय क्रिकेटच्या चाहत्यांना मिळालं आहे. स्मृती गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय महिला क्रिकेटमधील प्रमुख खेळाडूंपैकी एक आहे. तिची भारतीय महिला संघाच्या सर्व फॉरमॅटमधील प्रगती पाहता तिने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एक अनुभवी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून, तिने देशांतर्गत आणि फ्रँचायझी क्रिकेटमध्येही आपले नेतृत्वगुण दाखवले आहेत आणि अलीकडेच रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूला २०२४ आणि २०२६ मध्ये महिला प्रीमियर लीगचे विजेतेपद मिळवून दिले आहे.




२०१३ पासून भारतीय संघाचा भाग असलेल्या स्मृतीला भारतीय महिला क्रिकेट संघामध्ये खेळण्याचा दांडगा अनुभव आहे. संघ एका नवीन टप्प्यात प्रवेश करत असून, गेल्या काही वर्षांत केलेल्या प्रगतीवर पुढे वाटचाल करत असताना, आता स्मृती संघाचं नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारेल. जरी ती आतापासून पूर्णवेळ व्हाईट-बॉल कर्णधार असली तरी, स्मृतीने आतापर्यंत १८ टी-२० आणि ४ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले आहे. स्मृती मंधाना म्हणाली की, भारताचे नेतृत्व करण्याची जबाबदारी मिळणे हा एक अत्यंत विशेष सन्मान आहे. भारताचे प्रतिनिधित्व करणे ही माझ्यासाठी नेहमीच खूप महत्त्वाची गोष्ट राहिली आहे आणि आता संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत मोलाची बाब आहे. बीसीसीआय, निवड समिती, माझे सहकारी खेळाडू आणि माझ्या प्रवासात मला साथ देणाऱ्या तसेच माझ्यावर विश्वास टाकणाऱ्या प्रत्येकाची मी आभारी आहे.

## पोलिसांच्या साहसी कामगिरीसाठी 'मुख्यमंत्री शौर्य पदक'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कर्तव्य बजावताना जीवाची पर्वा न करता साहसी कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या शौर्याची दखल घेण्यासाठी राज्य सरकारकडून 'मुख्यमंत्री शौर्य पदक' सुरू करण्यात येणार आहे. या पदकासोबत ५० हजार रुपयांचे रोख पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार असून, दरवर्षी महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला या पदकांची घोषणा केली जाणार आहे. मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली.

माओवाद, दहशतवाद, जातीय दंगली, संघटित गुन्हेगारी आणि तस्करीसह अंतर्गत सुरक्षा तसेच बाह्य हल्लयांच्या प्रसंगी महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचारी जोखीम पत्करून कर्तव्य बजावतात. गडचिरोली आणि गोंदिया हे माओवादप्रभावित जिल्हे असून, अशा भागांत तसेच राज्यातील इतर ठिकाणी धाडसी कामगिरी करणाऱ्या पोलिसांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी हे पदक देण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून पोलीस दलातील शौर्याची दखल घेऊन विविध पदके दिली जातात. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात राज्यस्तरीय शौर्य पदक सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या पदकांची संख्या दरवर्षी निश्चित राहणार नाही. क्षेत्रीय पातळीवरून प्राप्त होणारे कामगिरीचे अहवाल आणि आलेल्या प्रस्तावांच्या आधारे पदकांची संख्या निश्चित केली जाईल. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली प्रथम निवड समिती प्रस्तावांची छाननी करेल. जिल्हास्तरावरून पोलीस अधीक्षक संबंधित विशेष पोलीस महानिरीक्षकांमार्फत, तर पोलीस आयुक्त थेट पोलीस महासंचालकांकडे प्रस्ताव सादर करतील. त्यानंतर गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शासनस्तरीय समितीकडून प्रस्तावांची छाननी होऊन ते गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांच्याकडे सादर केले जातील. विशेष म्हणजे, शौर्य पदक मरणोत्तर देण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, पोलीस कोठडीतील व्यक्तींच्या मृत्यूच्या घटनांमध्ये जवळच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्यासाठीच्या धोरणालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. पोलीस अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या मारहाण, अत्याचार अथवा दबावामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित व्यक्तीच्या जवळच्या वारसदारांना पाच लाख रुपयांची नुकसानभरपाई दिली जाणार आहे. कोठडीतील शारीरिक किंवा मानसिक छळामुळे कायमस्वरूपी अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यासही नुकसानभरपाईची तरतूद करण्यात आली आहे.

५० टक्क्यांपेक्षा कमी कायमस्वरूपी अपंगत्व असल्यास दोन लाख रुपये, तर त्यापेक्षा अधिक अपंगत्व असल्यास चार लाख रुपये नुकसानभरपाई दिली जाईल.

### मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन

### राहुल गांधींना पोलिसांनी उचलताच काँग्रेस आक्रमक

## ज्ञानेश कुमार लोकशाही बुडवतायेत, त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन अटक करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेस पक्षाने आकाशवाणी भवन परिसरात आंदोलन सुरु केले होते. यावेळी दिल्ली पोलिसांनी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्यासह अनेक काँग्रेस नेते आणि समर्थकांना ताब्यात घेतले आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीसह मतचोरी आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कृतींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. याच मुद्यावरुन महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारसह ज्ञानेश कुमार कुमार यांच्यावर जोरदार टीका केली आहे. ज्ञानेश कुमार लोकशाही डुबवत आहेत. त्यांच्यावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करावी, ही काँग्रेसची ठाम मागणी आहे.





विरोधी पक्षांच्या खासदारांना निवडणूक आयोगाला भेटण्यापासून रोखणे हा गंभीर विषय आहे. कोट्यवधी नागरिकांचे प्रतिनिधित्व करणारे खासदार आपले म्हणणे मांडण्यासाठी जात असताना त्यांना अडवले जाते, तर सामान्य नागरिकांच्या लोकशाही अधिकारांचे काय? असा सवाल सपकाळ यांनी केला आहे. निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीतील निरीक्षणे, निवडणूक आयुक्तांच्या सहकाऱ्यांनी केलेले आक्षेप आणि महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी केलेला पत्रव्यवहार यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. लोकशाही वाचवणे, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवणे आणि मतदारांचा अधिकार अबाधित राखणे ही काँग्रेसची ठाम भूमिका आहे असे सपकाळ म्हणाले. ज्ञानेश कुमार लोकशाही डुबवत आहेत. त्यांच्यावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करावी, ही काँग्रेसची ठाम मागणी आहे. 'वोट चोरी'विरोधात काँग्रेसचा संघर्ष सुरू आहे. फॉर्म-६ मधील बदल, डखठ प्रक्रिया आणि मुक्त व निष्पक्ष निवडणुकीशी संबंधित गंभीर प्रश्नांवर निवडणूक आयोगाला उत्तर द्यावे लागेल असे सपकाळ म्हणाले.

५० खासदारांसह २५० जणांना ताब्यात घेतलं

इंडिया आघाडीचे नेते निवडणूक आयोगाच्या कार्यालयाजवळ नऊ तासांहून अधिक काळ जमून निवडणूक आयुक्तांसोबत बैठकीची मागणी करत होते. त्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. दिल्ली पोलिसांनी सांगितले की, सुमारे ५० खासदारांसह २५० जणांना ताब्यात घेऊन नवी दिल्ली पोलीस लाइन्सच्या किंग्सवे कॅम्पमध्ये नेण्यात येत आहे. निवडणूक प्रणालीतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि काँग्रेसचे इतर अनेक नेते मंगळवार दुपारपासून आकाशवाणी भवन परिसरात धरणे आंदोलन करत होते. रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी राहुल गांधी, प्रियंका गांधी, काँग्रेस नेते आणि काही मित्रपक्षांना ताब्यात घेऊन बसमधून नेले. यापूर्वी, विरोधी 'इंडिया' आघाडीचे खासदार मंगळवारी पार्लमेंट स्ट्रीटपासून निवडणूक आयोगाच्या मुख्यालयापर्यंत मोर्चा घेऊन गेले होते. मात्र, पोलिसांनी त्यांना मध्येच अडवून अनेक खासदार आणि नेत्यांना ताब्यात घेतले. निवडणूक आयोगाच्या कार्यालयात पोहोचण्याचा प्रयत्न करत असताना राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वद्रा आकाशवाणी भवन परिसरात शिरले आणि एका झाडाखाली बसले.

विरोधी पक्ष मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची आणि मतदार याद्यांची विशेष सखोल पुनर्तपासणी (डखठ) रद्द करण्याची मागणी करत आहेत. दिल्ली पोलिसांनी आंदोलनस्थळावरून काँग्रेस खासदार पवन खेरा, के. सी. वेणुगोपाल आणि अमरिंदर सिंग राजा वारिंग यांच्यासह अनेक नेत्यांना ताब्यात घेतले.

## संपादकीय....

### शेतकऱ्यांना दिलासा

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमध्ये बळीराजाला मोठा दिलासा देणारा अभूतपूर्व निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वितरण रोहित्र, 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने मंगळवारी आज मंजुरी दिली. या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाचे कामे युद्धपातळीवर सुरु होणार आहेत. यंदाच्या कमी पर्जन्यमानामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी तब्बल २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली आहे. महावितरणकडून राज्यात सुमारे ४७ लाखांवर कृषी ग्राहकांना विविध क्षमतेच्या वितरण रोहित्रांद्वारे वीजपुरवठा केला जात आहे. दुष्काळी परिस्थितीत हा वीजपुरवठा सुरळीत आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम राहणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात वीज यंत्रणा सक्षम करण्याचे आदेश दिले आहेत. राज्य शासनाने मंजूर केलेल्या विशेष निधीच्या माध्यमातून तीन महत्वाचे कामे तातडीने करण्यात येणार आहेत. यामध्ये आवश्यकतेनुसार नवीन वितरण रोहित्रांची (ट्रान्सफॉर्मर्स) खरेदी केली जाईल. त्याद्वारे अतिभारित (ओव्हरलोड) किंवा नादुरुस्त रोहित्र बदलून सिंचनातील अडथळे दूर करण्यात येतील. यासोबतच कृषी वीजवाहिनीवर असलेल्या घरगुती वीज ग्राहकांना आणि शेतातील घरांना २४ तास सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार सिंगल फेज आणि थ्री-फेजचे नवीन 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' (एसडीटी) खरेदी करून ते बसवले जाणार आहेत. तसेच लांब अंतराच्या वीजवाहिन्यांवर कमी दाबाने (लो-व्होल्टेज) वीजपुरवठा होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी मात करून योग्य दाबाने व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँकेची खरेदी करण्यात येणार आहेत.

# कापूसः महाराष्ट्रातील एक नगदी पीक- पांढरे सोनेच

**(७ ऑक्टोबर: आंतरराष्ट्रीय कापूस दिवस सप्ताह.)**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक कापूस दिन दरवर्षी ७ ऑक्टोबरला साजरा केला जातो. कापूस या महत्त्वपूर्ण पीकाचे जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या योगदानाला सन्मान देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या अविभाज्य विकास संघटनेने (णछउढऊ) २०१९ साली जागतिक कापूस दिनाची स्थापना केली. कापूस हे केवळ वस्त्रउद्योगातच नव्हे तर अनेक औद्योगिक उत्पादनांमध्ये वापरले जाते. कापसाच्या उत्पादनामुळे लाखो शेतकऱ्यांना रोजगार मिळतो. विशेषतः भारतासारख्या देशांमध्ये, कापसाचे उत्पादन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी, या एका शेतकरी पुत्राने सदर मार्गदर्शक संकलित लेख प्रस्तुत केला जी.... संपादक.

जागतिक कापूस दिनानिमित्ताने कापूस उद्योगातील शाश्वत विकास, तंत्रज्ञान, आणि शेतकऱ्यांना दिला जाणारा पाठिंबा याबाबत जागरूकता वाढवली जाते. यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठांपर्यंत प्रवेश मिळवून देण्याचे महत्त्व अधोरेखित होते. यंदाच्या जागतिक कापूस दिनाचा मुख्य उद्देश कापूस उत्पादनाच्या शाश्वत पद्धतींवर आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यावर भर देणे आहे. भारतात व महाराष्ट्रात कापूस हे एक महत्त्वाचे नगदी पीक आहे, ज्याला पांढरे सोने म्हणूनही ओळखले जाते. अत्यावश्यक माहिती-

(१) जमीन आणि हवामान : ४ जमीन: चांगल्या निचऱ्याची व सुपीक काळी माती कापसासाठी उत्तम असते. जमिनीचा सामू (कि) ६ ते ८.५ असावा लागतो. ४ हवामान: हे उष्ण व दमट हवामानातील पीक आहे. वाढीसाठी १५ओ ते ३५ओउ तापमान योग्य असते. (२) लागवड आणि बियाणे: ४ पेरणीची वेळ: जून ते जुलै- खरीप हंगाममध्ये पाऊस सुरू झाल्यावर पेरणी केली जाते. ४ बियाणे प्रमाण: हेक्टरी योग्य अंतर राखून बीटी कापसाची लागवड करतात. कोरडवाहूसाठी ३ु४ किंवा ४ु४ फूट आणि बागायतीसाठी ५ु२ किंवा ६ु३ फूट अंतर ठेवावे लागते.

(४) खत व्यवस्थापन: ४ रासायनिक खते: बागायती बीटी कापसासाठी हेक्टरी १२०:६०:६० किलो नत्र, स्फुरद व पालाश (छझघ) द्यावे लागते. ४ पाडलेले टप्पे: १ पेरणीच्या वेळी, २ ३० दिवसांनी आणि ३ ६० दिवसांनी योग्य प्रमाणात युरिया व इतर खतांचे सामने द्यावे लागतात. (५) पाणी व किडींचे व्यवस्थापन: ४ पाणी: पिकाला ८०० ते ९०० मिमी पाण्याची गरज असते. ठिबक सिंचनाचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होऊ शकते, असे सांगतात. ४ कीड नियंत्रण: पात्या व बोंडे गळ रोखण्यासाठी तसेच गुलाबी बोंडअळी व रस शोषक किडींपासून संरक्षण करण्यासाठी योग्य किटकनाशकांची फवारणी करावी लागते.

रुई याच्याशी गल्लत करू नका. कापूस हा वनस्पतीपासून मिळणारा आणि सेल्युलोजयुक्त तंतू पूर्वापार मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा धागा आहे. कापूस हे एक नगदी पीक आहे. कापसाला पाण्याचे आकर्षण आहे. सुती कपडे घातल्यास हाच गुणधर्म घाम टिपून घ्यायला मदत करतो. म्हणूनच उष्ण कटिबंधातील देशात सुती कपडे प्राधान्याने वापरतात. कापूस खूप मऊ असतो. कापसाला पांढरे सोने- व्हाईट गोल्ड म्हटल्या जाते. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्याला ''पांढऱ्या सोन्याचा जिल्हा'' म्हणून ओळखल्या जाते. कापसाच्या बियांना सरकी म्हणतात. सरकी हे गुरांचे खाद्य आहे, तर सरकीचे तेल स्वयंपाकासाठी वापरायचे एक स्वस्त तेल आहे. या तेलाचा साबणात आणि अन्य व्यवसायांत वापर होतो. कापसामध्ये जवळपास ९५ % सेल्युलोज असते. कपसाच्या एका नवीन जातीचा शोध लागला आहे, नाव आहे सावरी.मराठी-हिंदीमध्ये कापसाला रुई अस प्रतिशब्द आहे. मात्र रुई या विषारी वनस्पतीचा आणि कापसाचा काही संबंध नाही. असे असले तरी रुईच्या झाडापासूनही एक प्रकारचा अतिशय मऊ कापूस मिळतो, त्याच्या गाद्या-उश्या करतात. रुईच्या झाडापासून निसटलेला हा मऊ कापूस दशदिशांना उधळत असतो.

इतिहास: साधारणत: इसवी सन पूर्व ७०० वर्षापूर्वीपासून भारतीय उपखंडात कापसाची शेती केली जाते. याचा पुरावा पाकिस्तानातील मेहरगढ या ठिकाणी झालेल्या उत्खननातून मिळाला. हजारो वर्षांपूर्वी प्राचीन भारत, चीन आणि इजिप्तमध्ये कापसाच्या धाग्यांपासून कपडे तयार केले जात. कापसापासून मिळणारे धागे पाच प्रकारचे असतात - १ अतिशय लांब- १-३/८ इंच आणि त्याहूनही लांब, २ लांब १-१/८ इंच ते १-११/३२ इंच, ३ मध्यम लांब- १-१/३२ इंच ते १-३/३२ इंच, ४ मध्यम-१३/१६ इंच ते १ इंच, आणि ५ आखूड- १३/१६ इंचापेक्षा कमी लांबीचा. .

कापूस वेचणी- उत्पादन: अमेरिका, अर्जेंटिना, उजबेकिस्तान, ऑस्ट्रेलिया, चीन, तुर्कस्थान, तुर्कमेनिस्तान, पाकिस्तान, ब्राझील, भारत या देशांमध्ये कापूस पिकतो. अमेरिकेच्या राष्ट्रीय कापूस परिषद २०११ च्या अहवालानुसार जगातील पाच अग्रेसर कापूस उत्पादक देश : (१) अमेरिका (२) भारत, (३) ब्राझील, (४) ऑस्ट्रेलिया आणि (५) उझबेकिस्तान हे होत.

भारत : गुजरातमधील कापूस उत्पादन- जगातील कपाशीखालील क्षेत्राच्या एक चतुर्थांश क्षेत्र भारतात कापूस लागवडीखाली आहे. भारताच्या महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात कापसाचे पीक घेतात. तसेच गुजरात, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांतही कापसाची लागवड केली जाते. कापसाच्या जातीचे शास्त्रीय नाव गॉसिपियम आहे. व्यापारी तत्त्वावर वापरला जाणाऱ्या कापसाची झाडे बहुधा गॉसिपियम हिर्सुटम व गॉसिपियम बार्बाडेन्स या दोन उपजातींची असतात.

महाराष्ट्र :महाराष्ट्रात कापूस हे प्रमुख नगदी पीक आहे. विदर्भात कापसाच्या पिकाला आवश्यक असणारी काळी कसदार मृदा व कोरडे हवामान असल्यामुळे तेथे कापसाचे सर्वाधिक उत्पादन होते. विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याला पांढरे सोने पिकवणारा म्हणजेच सर्वाधिक कापूस पिकवणारा जिल्हा म्हणतात. कापसापासून मोठ्या प्रमाणात सुती कापडाची निर्मिती करतात. महाराष्ट्रात अकोला येथे कापसाच्या पिकासाठी सर्वात मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. कापसाच्या आधुनिक जाती: जेनेटिकली मॉडिफाईड- जैवतंत्रज्ञानाने विकसित केलेल्या कापसाला बी.टी. कॉटन म्हणतात. कापूस या पिकावरील रोग- १ मूळकूज, २ दह्या, ३ कवडी, ४ पानावरील काळे ठिपके, ५ बोंडावरील काळे ठिपके, ६ करपा, यातील शेवटचे तिन्ही रोग कवकजन्य आहेत. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय कापूस दिनाच्या समस्त शेतकरी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**एक शेतकरी पुत्र**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.**

# मोहा येथे लोकजनशक्ती पार्टीचे बाबासाहेब कसबे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रविण म .कसबे / मोहा प्रतिनिधी - कळंब येथे लोकजनशक्ती (रामविलास पासवान) पार्टीच्या वतीने धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ३० सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय व तालुकास्तरावरील पक्ष संघटनात्मक आढावा कार्यकारिणी बैठकीत धाराशिव युवा जिल्हाध्यक्षपदी बाबासाहेब कसबे यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली.व निवडीचे नियुक्तीपत्र जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांच्या हस्ते देण्यात आले.या निवडीबद्दल बाबासाहेब कसबे यांची मोहा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराजवळ जल्लोष व आतषबाजीत सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष अशोक कसबे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पार्टीचे युवा कळंब तालुकाध्यक्ष अमर मडके,बिटू मडके, संताजी वीर ,मयुर मडके, भारत कसबे तसेच भिमनगरमधील समाजबांधवांची उपस्थिती होती. व नवनियुक्त युवा जिल्हाध्यक्षाचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले .व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूरविद्यापीठ,सोलापूर अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थी खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध पदकांची कमाई केली. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.





## प्रथमेश पाटीलचे सुवर्णपदकासह ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड

या स्पर्धेत ६५ ते ७० किलो वजनी गटात प्रथमेश अर्जुन पाटील याने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. त्याची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच ४७ ते ५० किलो वजनी गटात अविनाश खंडाळे याने रौप्यपदक, ५० ते ५५ किलो वजनी गटात प्रेम कांबळे याने कास्यपदक, तर ५५ ते ६० किलो वजनी गटात संकेत मोरे आणि सुशांत कुलकर्णी यांनी प्रत्येकी कास्यपदक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

या सर्व विद्यार्थी खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे नाव विद्यापीठस्तरावर उज्ज्वल केले आहे.या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव तसेच सर्व विभागांचे उपप्राचार्य, विभागप्रमुख आणि सेवकवर्ग यांनी यशस्वी विद्यार्थी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

विद्यार्थी खेळाडूंना जिमखाना विभागप्रमुख प्रा. अनिल परमार, प्रा. डॉ. उमेश साळुंखे, प्रा. विठ्ठल फुले आणि प्रा. मनोज खपाले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंनी सातत्यपूर्ण सराव व उत्कृष्ट तयारीच्या माध्यमातून हे यश संपादन केले.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून विद्यार्थी खेळाडूंचे अभिनंदन होत असून, प्रथमेश पाटीलच्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेतील आगामी कामगिरीकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.



# दुष्काळाच्या तीव्र झळा, भीमा- सीना नदीपात्रातून अवैध्य वाळू उपसा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - सोलापूर जिल्ह्यातील इंदापूर पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असून, शेती व पिण्याचे पाणी व जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने सर्व आकडा तालुके सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले आहेत. एकीकडे शेतकरी आणि ग्रामस्थ पाण्याकडे संघर्ष करत असताना दुसरीकडे भीमा आणि सेना नदी त अवैद्य वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर होत असल्याच्या तक्रारी नदीकाठच्या गावातून येत आहे.

महसूल आणि पोलीस प्रशासनाकडे नागरिकांमधून कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

यंदाच्या वर्षी अपेक्षित प्रमाणे पाऊस न झाल्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक भागांमध्ये पिण्याचे पाण्याची बिकट अवस्था निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील पिकांना मोठा बसला असून रब्बी हवामानानंतरही शेतकऱ्यांमध्ये अनिश्चितता आहे व अनेक गावांमध्ये पिण्याचे पाण्याची आणि आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

उजनी पाणीसाठा असला तरी त्याचा सर्व समान भागांमध्ये पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे नदीपात्र कोरडे किंवा उथळ झालेले आहे. या परिस्थितीचा फायदा घेत अवैध उपसा चालू असल्याचे शेजारील ग्रामस्थांकडून होत आहे.

पंढरपूर तालुक्यातील व सोलापूर जिल्ह्यातील काही नदीपात्रामध्ये रात्रीच्या वेळी वाहने व यंत्रसामग्री उभा करून वाळू उपसा केल्या जात असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून होत आहेत.

पत्रातून मोठ्या प्रमाणावर उपसा होत असल्याने नदीपात्रातून नैसर्गिकरीत्या रचनेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. नदीपत्रातील पाण्याची खोली व अनेक असल्यामुळे त्याची भौगोलिक परिस्थिती बदलू शकते त्यामुळे पाण्याच्या प्रवाहामुळे नदीपत्रातील प्रवाहवरील परिणाम होऊ शकतो. अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

नदीकाठच्या पाणीपुरवठा योजनेचा धोका. भीमा आणि सेना नदीकाठच्या पाणीपुरवठा योजना पाणी किंवा नदीकाठच्या जलसंधारण विभागावर झाल्यास वाळू उपसा झाल्यास नदीपत्रातील पाण्याची पातळी व पुनर्भुजरण पृथ्वीवर होणारी परिस्थिती असे ग्रामस्था व्यक्त करीत आहे. दुष्काळाच्या काळात नदीकाठचे जलस्रोता अधिक महत्त्वाचे ठरत आहे. किती संरक्षण करण्याची जबाबदारी प्रशासनाकडे आहे त्यामुळे नदीपात्रातील अवैद्य वाळू उपसा आवश्यक आहे अशी मागणी होत आहे.

**विशेष पतके तैनात करण्याची मागणी**

भीमा ने सेना नदीकाठच्या भागातील महसूल पोलिसांनी महसूल विभागाची संयुक्त पदके तयार करून निमित्त तपासणी करावी रात्रीच्या वेळी होणाऱ्या हालचालीवर विशेष लक्ष ठेवून नदीकाठची अवैद्य वाळू उपसा करणाऱ्या कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात पालक मेळावा व मार्गदर्शन शिबिर संपन्न




# महापुरुषांच्या विचारांचा आदर्श आणि शैक्षणिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करावे : वाघमारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग । दादासाहेब बनसोडे - सामाजिक न्याय व सहाय्य विभागाच्या माध्यमातून नळदुर्ग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात पालक मेळावा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या मनावर महापुरुषांच्या विचारांचा प्रभाव आणि प्रगल्भ विचार रुजणे त्यांचा आदर्श आवश्यक असून, विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या विचारांचा आदर्श व शैक्षणिक डोळ्यासमोर ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल करावी, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते जयभीम वाघमारे यांनी केले.

आजचा विद्यार्थी हेच उद्याचे उज्ज्वल भविष्य आहे. विद्यार्थ्यांनी इतरांना नाहक त्रास न देता अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करावे. समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विचारांना चालना देत स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न करावा, असेही वाघमारे यांनी सांगितले.

नळदुर्ग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सामाजिक जाणीव आणि अभ्यासाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या पालक मेळावा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जयभीम वाघमारे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहाचे अधीक्षक मोहन शिंदे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मार्गदर्शन पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, संत रोहिदास महाराज, राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेच पुजन करण्यात आले

यावेळी व्यसनमुक्तीची शपथ घेण्यात आली कार्यक्रमास कर्मचारी बी आर मोटे, एल के विभुते, एम झेड चव्हाण, एम डी सुरवसे, श्रीमती एस के लोंढे व्हि के घोडके, एस ए जगताप सह कंपनीचे सर्व कर्मचारी राठोड शिंदे माने पवार आल्हाट आदिजन उपस्थित होते व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले .

या पालक मेळाव्यास पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूरला स्वतंत्र आरटीओ कार्यालयासाठी आ. समाधान आवताडे यांचा पाठपुरावा

## आ.आवताडेंच्या मागणीची मुख्यमंत्र्यांकडून दखल; परिवहन विभागाला तात्काळ कार्यवाहीचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी - पंढरपूर येथे स्वतंत्र प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) सुरू करण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन पंढरपुरात स्वतंत्र आरटीओ कार्यालयास 'विशेष बाब' म्हणून मंजुरी देण्याची मागणी त्यांनी केली आहे. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी परिवहन विभागाला मंजुरी देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याने लवकरच पंढरपुरात स्वतंत्र आरटीओ



कार्यालय होण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.

पंढरपूर हे राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र असून वर्षभरात चार प्रमुख एकादशी उत्सवांमुळे महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश आदी राज्यांतून लाखो भाविक येथे येतात. तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखडा, अपर जिल्हाधिकारी व अपर पोलीस अधीक्षक कार्यालयांसह वाढता व्यापार, पर्यटन आणि राष्ट्रीय महामार्गांचे जाळे यामुळे पंढरपूरचा प्रशासकीय व आर्थिक विस्तार वेगाने होत आहे. पंढरपूरसह शेजारील तालुका परिसरातील वाहनांची संख्या अधिक आहे. वाहन नोंदणी, परवाना, कर भरणा आदी कामांसाठी नागरिकांना सोलापूरसाचे अंतर दूर होते.

पंढरपुरात स्वतंत्र आरटीओ कार्यालयामुळे परिसरातील नागरिकांना परिवहन विभागाच्या सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊन वाहन नोंदणी व परवाना प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होणार आहे. त्यामुळे पंढरपुरात आरटीओ कार्यालयास 'विशेष बाब' म्हणून मंजुरी द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांनी केली केली होती. या मागणीची प्रत परिवहन मंत्री प्रताप सर नाईक तसेच परिवहन विभागाचे आयुक्त यांना पाठविण्यात आली होती. या मागणीला मुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने पंढरपुरात स्वतंत्र आरटीओ कार्यालय होण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध योजनांची माहिती व लाभ वितरण कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी मिलिंद जाधव - आदिवासी विकास विभागाच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत आदिवासी बांधवांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती, मार्गदर्शन तसेच पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला आदिवासी बांधव, महिला, विद्यार्थी व स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमास अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे गोपीचंद कदम, भा.प्र.से. यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तहसीलदार शहापूर परमेश्वर कासुळे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी दिवाकर काळपांडे, प्रकल्प अधिकारी अरविंद जाधव, सहाय्यक लेखाधिकारी विजय कोरडे यांच्यासह आदिवासी विकास विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी आदिवासी समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देत महिला सक्षमीकरण, शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, आर्थिक उन्नती तसेच विविध शासकीय




योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या विकासाच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. योजनांचा लाभ

**प्रकल्प अधिकारी गलांडे यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन**

घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, पात्रता व अर्ज करण्याची प्रक्रिया याबाबतही उपस्थितांना माहिती देण्यात आली.

शासनाच्या योजना तळागाळातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, हा सेवा संकल्प अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमादरम्यान पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात आला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन शहापूर प्रकल्प अधिकारी श्रीमती गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पतील अधिकारी व कर्मचारी यांच्या सक्रिय सहभागातून कार्यकर्म पार पडला.




# वन्यजीव सप्ताहानिमित्त तांदुळवाडी शाळेत जनजागृती व वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब:प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे - कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी ता.कळंब येथे वन्यजीव सप्ताहानिमित्त सामाजिक वनीकरण विभाग, कळंब यांच्या वतीने वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव, पर्यावरण व निसर्ग संवर्धनाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास सामाजिक वनीकरण विभागाचे विभाग प्रमुख बाळासाहेब सोनवणे, पांचाळ मॅडम तसेच श्री. जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वन्यजीवांचे पर्यावरणातील महत्त्व, वन्यजीवांची अन्नसाखळी तसेच जैवविविधतेचे संवर्धन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, निसर्गातील प्रत्येक सजीवाचे एकमेकांशी अतूट नाते असून वन्यजीवांचे अस्तित्व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. एखाद्या प्रजातीचे अस्तित्व धोक्यात आल्यास त्याचा परिणाम संपूर्ण अन्नसाखळीवर होऊ शकतो. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण करणे ही केवळ वन विभागाची किंवा शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी निसर्गावर प्रेम करून पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश कृतीतून देत विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प केला. वृक्ष हे पर्यावरणाचा महत्त्वाचा घटक असून वन्यजीवांना अधिवास उपलब्ध करून देण्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन आवश्यक असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वन्यजीव व पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजण्यास मदत झाली.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. संतोष भोजने, सहशिक्षक श्री. संतोष मोहिते, श्री. सयाजी शिंदे, सौ. आशा पवार, सौ. रसिका आगरकर तसेच शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# खामसवाडी परिसरात ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक; हमीभाव मिळेपर्यंत कारखाने बंद ठेवण्याची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे खामसवाडी (प्रतिनिधी) - कळंब तालुक्यातील खामसवाडी परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाला योग्य व हमीभाव मिळावा या मागणीसाठी शेतकरी आक्रमक झाले आहेत. हमीभाव मिळेपर्यंत कोणत्याही गूळपट्टी, खांडसरी व साखर कारखान्याने गाळप हंगाम सुरू करू नये, अन्यथा ऊस वाहतूक करणारी वाहने रस्त्यावर अडवू, असा सज्जड इशारा शेतकऱ्यांनी कारखानदारांना दिला आहे.

शेतकऱ्यांनी १ ऑक्टोबर रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी निवेदन सादर केले होते. त्यामध्ये सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी प्रति टन किमान ५ हजार रुपये, तर गूळपट्टी व खांडसरी उद्योगांनी प्रति टन ४ हजार रुपये भाव द्यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली होती. शिवाय शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित केल्यानंतरच गाळप हंगाम सुरू करण्याची परवानगी प्रशासनाने द्यावी, अशी मागणीही निवेदनात केली होती. मात्र प्रशासन व कारखाना व्यवस्थापनाने या निवेदनाची कोणतीही दखल न घेताच खामसवाडी परिसरातील काही गूळपट्टी व

**प्रती टन ५ हजार रुपये उसाला हमी भाव देण्याची शेतकऱ्यांची मागणी**

खांडसरी उद्योगांनी गाळप सुरू केले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली. या पार्श्वभूमीवर दि. ५ ऑक्टोबर रोजी खामसवाडी, मोहा, तडवळा परिसरातील शेकडो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एकत्र येत थेट कारखाना गाठला. शेतकऱ्यांनी खामसवाडी येथील सिद्धिविनायक ग्रीन टेक ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड, मोहा येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड आणि तडवळा येथील एस.पी. शुगर ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड या तीनही कारखान्यांच्या व्यवस्थापनाला लेखी निवेदन दिले.

ऊस उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. मजुरी, खते, औषधे, वाहतूक याचा खर्च पाहता सध्याचा मिळणारा दर हा तुटपुंजा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांशी संवाद साधून पारदर्शक पद्धतीने दर जाहीर करावा आणि तोपर्यंत कारखाना बंद ठेवावा, अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी यावेळी मांडली. तसेच प्रति टन किमान ४ हजार रुपये भाव जाहीर केल्याशिवाय कारखाने सुरू करू नयेत. जर शेतकऱ्यांशी चर्चा न करता कारखाने सुरूच ठेवले तर रस्त्यावर ऊसाची वाहतूक करणारी वाहने अडविण्यात येतील आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी तेरणा कारखान्याचे माजी संचालक दिलीप पाटील, सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, चंद्रकांत पाटील, सतीश माने, श्याम पाटील, सचिन शेळके, शशिकांत पाटील, अविनाश शेळके, संदीप जाधव, सतीश पाटील यांच्यासह खामसवाडी, मोहा, तडवळा परिसरातील शेकडो ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन कारखाना व्यवस्थापनाकडे सादर करण्यात आले.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला असून आगामी काळात कळंब तालुक्यात ऊसदराचा प्रश्न चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

**mo डॉ. बी.पी रोंगे यांचा पुणे शिक्षक मतदारसंघासाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल**

# शिक्षकांमधूनच उठाव; शिक्षकांच्या प्रश्नांसाठी लढणार आणि जिंकणार : डॉ. बी. पी. रोंगे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर -

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ज्ञानयात्री डॉ. बी.पी. रोंगे यांनी सोमवारी (दि. ५ आक्टोबर) पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील नामदेव पायरीचे दर्शन घेऊन आपल्या प्रचाराचा शुभारंभ केला. पंढरपुरसह पुणे मार्गावरील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले तसेच त्यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. यानंतर त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पुण्याकडे प्रस्थान करून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हा. चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे, श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे सचिव डॉ. सूरज रोंगे, संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी व रोंगे कुटुंबीय उपस्थित होते. याप्रसंगी माध्यमांशी बोलताना डॉ. बी.पी. रोंगे म्हणाले, गेल्या दीड वर्षापासून पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांमध्ये शिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधत असून त्यांच्या समस्या समजून घेत आहे. शिक्षकांच्या नोंदणी प्रक्रियेतही आम्ही सक्रिय सहभाग घेतला. या कामाला पाचही जिल्ह्यांतील शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, शिक्षकांमधूनच उमेदवारीसाठी आग्रह झाल्याने आपण निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

माझ्या उमेदवारीमागे शिक्षकांमधून झालेला उठाव आहे. ४० वर्षांचा संघर्षमय अनुभव, शिक्षक व प्राध्यापक म्हणून कामाचा अनुभव आणि शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने उभे राहण्याची भूमिका यामुळे शिक्षकांनी नेतृत्व करण्यासाठी

**पंढरपूरच्या नामदेव पायरीवरून डॉ. बी.पी. रोंगे यांनी फोडला प्रचाराचा नारळ**

पुढे येण्याचा आग्रह केला. त्यामुळे त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला,असे डॉ. रोंगे यांनी स्पष्ट केले.

भाजपकडून उमेदवारी मिळण्याची अपेक्षा होती. मात्र, उमेदवारी जाहीर न झाल्यानंतरही शेवटच्या क्षणापर्यंत पक्षाकडून आपल्या कामाची दखल घेतली जाईल, अशी आशा असल्याचे त्यांनी सांगितले. चंदगडपासून करमाळ्यापर्यंत तसेच मैंदर्गी-दुधनीपासून मुळशीपर्यंत शिक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचा दावा त्यांनी केला.

जुनी पेन्शन आणि अशैक्षणिक कामांचा मुद्दा प्राधान्याने: डॉ.बी. पी. रोंगे निवडून आल्यास जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित असलेल्या सुमारे २६ हजार शिक्षकांना न्याय मिळवून देणे ही आपली पहिली प्राथमिकता असेल, असे डॉ. रोंगे यांनी सांगितले तसेच शिक्षकांवर असलेल्या अशैक्षणिक कामांचा अतिरिक्त भार कमी करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांना अधिक वेळ मिळावा, यासाठी विधिमंडळात ठोस भूमिका मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वेतनश्रेणी निश्चिती आणि अनुदानाच्या टप्प्यांच्या प्रश्नातून शिक्षकांची सुटका करण्यासाठीही अभ्यासपूर्ण पद्धतीने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नुसते लढायचे नाही, तर लढायचे आणि जिंकायचेच आहे. श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या आशीर्वादाने विजयाची माळ आपल्या गळ्यात पडेल, असा विश्वास डॉ. रोंगे यांनी व्यक्त केला.




क्षणचित्रे-भल्या पहाटे विठ्ठलाचे दर्शन घेऊन पंढरपूर शहरातील थोर पुरुषांना अभिवादन करून डॉ. बब्रूवाहन पांडुरंग रोंगे हे पुणे विभाग शिक्षक मतदार संघासाठी फॉर्म भरण्यासाठी पुण्याकडे रवाना झाले. डॉ.बी.पी. रोंगे हे पुणे विभाग शिक्षक मतदार संघातून उमेदवार म्हणून उभे असल्यामुळे आज फॉर्म भरण्यासाठी पुण्याकडे रवाना झाले. यामध्ये पाचही जिल्ह्यांतील जवळपास ५ हजार शिक्षक आपली स्वतःची वाहने घेऊन आले होते. दोन किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा होत्या. पंढरपूर ते पुणे दरम्यान प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये डॉ. रोंगे सरांचे आगमन होताच त्या ठिकाणी तेथील शिक्षक डॉ. रोंगे सरांचे भव्य सत्कार करत होते. पंढरपूर, वाखरी मार्गे वेळापूर, माळशिरस, नातेपुते, लोणंद, फलटण, शिरवळ पासून पुण्यात साधू वासवानी चौक मार्गे पुण्याच्या विधानभवनामध्ये स्थिरावली.

# जीव वाचवणारी '१०८' ठरतेय मृत्यूची वाट!

## रुग्णवाहिकेची वाट पाहताना श्वास थांबतोय? आरोग्य व्यवस्थेला कधी जाग येणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**विश्वनाथ चव्हाण अक्कलकोट**




अक्कलकोटमध्ये गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार करण्यासाठी हवी तशी अत्याधुनिक यंत्रणा नसल्यामुळे, इथल्या प्रत्येक नागरिकाला उपचारासाठी नाइलाजाने सोलापूरच्या मोठ्या रुग्णालयांकडे धाव घ्यावी लागते. अशा प्रत्येक जीवघेण्या क्षणी गरिबांचा एकमेव आधार ठरणाऱ्या '१०८' क्रमांकावर संपर्क साधला, की यंत्रणेची अनास्था एकापाठोपाठ एक क्रूर विनोद करू लागते. फोन केल्यानंतर आधी प्रतीक्षा करायला लावली जाते आणि तासनतास ताटकळत ठेवल्यानंतर उद्धटपणे सांगितले जाते, गाडी उपलब्ध नाही!

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या किंवा मृत्यूशी झुंजणाऱ्या रुग्णासाठी एक सेकंद महत्त्वाचा असतो. मात्र येथे तासनतास गाडीसाठी ताटकळत राहावे लागल्यामुळे उपचाराअभावी वाटेतच प्राण सोडण्याची वेळ रुग्णांवर येत आहे.जर वेळेला गाडीच मिळणार नसेल, तर आमच्या हक्काच्या पैशातून चालणारी ही '१०८' सेवा फक्त नावापुरतीच आहे का? असा संतप्त आणि काळजाला घरे पाडणारा सवाल आज अक्कलकोटमधील प्रत्येकसामान्य नागरिक विचारत आहे. वेळेवर वाहन न मिळाल्यामुळे रुग्णाला वेळेत दाखल करणे अशक्य होत असून, या ढिसाळ व्यवस्थेमुळे अक्कलकोटच्या वाटेवर नाहक जीव जात आहेत.हा केवळ एका रुग्णवाहिकेचा प्रश्न नाही, तर तो माणसाच्या जगण्याच्या अधिकाराचा प्रश्न आहे. वेळेवर वाहन न मिळणे म्हणजे अप्रत्यक्षपणे मृत्यूच्या दाढेत ढकलण्यासारखेच आहे. आता तरी आरोग्य विभागाने या भीषण वास्तव्याची दखल घेऊन ढिसाळ कारभार सुधारणार का, की अजून किती जणांच्या बलिदानाची वाट पाहावीर लागणार, असा संतप्त सवाल संपूर्ण तालुक्यातून विचारला जात आहे.

अक्कलकोट मध्ये '१०८' रुग्णवाहिकेविना रुग्णांचे हाल होत असतानाही स्थानिक राजकीय नेते व पदाधिकारी मूग गिळून गप्प आहेत. गरीबांच्या जिवाशी खेळ सुरू असताना सर्वपक्षीय पुढारी केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. निवडणूक आली की मते मागणारे नेते आता आरोग्य यंत्रणेच्या या धोरणावर बोलायला तयार का नाहीत? नागरिकांच्या या आक्रोशावर आता कोण आवाज उठवणार, हा मोठा सवाल आहे!

जर गरजवंतांच्या वेळेला १०८ ही आपत्कालीन रुग्णवाहिका उपलब्ध होत नसेल, तर मग ही कागदोपत्री सेवा नावापुरतीच कशासाठी ठेवली आहे?या गंभीर समस्येकडे जिल्हा आरोग्य प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन तालुक्यातील '१०८' रुग्णवाहिकांच्या फेऱ्या आणि उपलब्धतेचे योग्य नियोजन करावे,तसेच दोषींवर कारवाई करावी,असेही मागणी जोर धरत आहे.

### साहेब, गाडी पाठवा... माझ्या माणसाचा जीव चाललाय!

**साहेब, गाडी पाठवा... माझ्या माणसाचा जीव चाललाय! फोनवर विरघळणाऱ्या आवाजात विनवणी करणाऱ्या नातेवाइकांच्या या हताश हाकेला पलीकडून मिळणारे उत्तर ठरलेले असते–सध्या गाडी वेटिंगवर आहे, अर्धा तास लागेल... एक तास लागेल... आणि या अर्ध्या–एक तासाच्या खेळात कधी रुग्णाची कायमची नाडीच शांत होते, तर कधी नातेवाइकांच्या अश्रूंना बांध फुटतो. अक्कलकोट तालुक्यात सध्या '१०८' या शासकीय आपत्कालीन रुग्णवाहिकेचा हाच रोजचा आणि भयानक अनुभव बनला आहे.**

---

भक्तीच्या अथांग सागरात न्हाऊन निघणार गौडगाव

# शनि अमावस्या निमित्त श्री जागृत मारुती मंदिरात भाविकांची ओढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील ऐतिहासिक, हेमांडपंती आणि दक्षिणमुखी जागृत देवस्थान असलेल्या गौडगाव (बु.) येथील श्री जागृत मारुती मंदिरात येत्या शनिवारी (दि. १० ऑक्टोबर) रोजी अथांग भक्तीचा महापूर येणार आहे. निमित्त आहे, वर्षातून एकदाच अत्यंत भाग्याने येणाऱ्या पवित्र 'शनि अमावस्या' पर्वणीचे! या एका दिवसासाठी जणू संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशची पावले जागृत मारुतीच्या मंदिराकडे वळत आहेत.

शनिवारी पहाटे ५ वाजता गौडगावचे मारुती मंदिरात वैदिक मंत्रोच्चार, हवनाचा सुवास आणि भक्तांच्या हुंदक्यामिश्रित हाकेने दुमदुमून जाणार आहे. या पवित्र मुहूर्तावर होणारा रुद्राभिषेक, होमहवन आणि महाआरती म्हणजे जणू ईश्वराशी माणसाचे थेट साक्षात जुळणारे नाते ठरणार आहे. अनेक भक्तगण तर शहरांची दगदग विसरून, आदल्या रात्रीच मंदिरात मुक्कामी येऊन बसणार आहेत, तर कित्येकजण पहाटेच्या गारठ्यात रांगेत उभे राहून फक्त एकदा त्या जागृत मूर्तीचे डोळे भरून दर्शन घेण्यासाठी आतुर झाले आहेत.११ शनिवार किंवा मंगळवार मारुतीचे दर्शन घेतल्याने मनातील प्रत्येक सल आणि इच्छा पूर्ण होते, हा केवळ नियम नाही, तर पिढ्यानपिढ्या जपत आलेला विश्वासाचा धागा आहे.

या भक्तीला केवळ धार्मिकतेची नव्हे,तर माणुसकीच्या सुंदर स्पर्शाची जोड लाभली आहे. ट्रस्टचे अध्यक्ष सचिव व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली यंदा या मंगल प्रसंगी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.दुसऱ्याच्या वहाणाऱ्या रक्ताला जीवन देणे, हीच मारुतीरायाची खरी भक्ती आहे,हा संदेश यातून दिला जात आहे. तसेच, दूरदूरवरून चालत किंवा वाहनाने आलेल्या प्रत्येक थकलेल्या भक्तासाठी मंदिर समितीने महाप्रसादाची सोय केली आहे. अन्नदानाची ही सेवा म्हणजे जणू मारुतीरायाने आपल्या सर्व लेकरांना आपल्या पंखाखाली घेत प्रेमाने भरवल्याचा भास निर्माण करणारी ठरणार आहे. शनिवारी ही शनि अमावस्या जेव्हा माथ्यावर येईल, तेव्हा प्रत्येक भक्ताच्या डोळ्यात एक अनामिक अश्रू आणि ओठांवर कृतज्ञतेचे हास्य असेल. कारण येथे येणारा माणूस कधीही रिकाम्या हाताने किंवा दुःखी परत जात नाही, हीच या जागृत देवस्थानाची प्रचिती आहे.

तरी या पावन आणि भावनिक सोहळ्यात, मारुतीरायाच्या चरणी लीन होऊन आत्मिक शांततेचा अनुभव घेण्यासाठी सर्व भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने अत्यंत आर्ततेने करण्यात येत आहे.

---

# 'रेनी कार्निवल-संवाद तरुणाईचा' भिवंडीत रंगला वैचारिक जागर; टॉक शो, संसद-संवाद अन् कवी संमेलन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

तरुणांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना विचार मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे आणि सामाजिक चळवळीशी तरुणाईचा संवाद प्रभावी व्हावा, या उद्देशाने समता संघर्ष संघटन व समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने 'रेनी कार्निवल - संवाद तरुणाईचा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यंदा कार्यक्रमाचे चौथे वर्ष असून, रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पडघा–पाच्छापुर रोडवरील रिव्हर टच ॲग्रो फॉर्म (दोंदे फॉर्म हाऊस), पाच्छापुर येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे निमंत्रक समता संघर्ष संघटनचे अध्यक्ष शैलेश दोंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रा. आशालता कांबळे , डॉ सुरेश कापरे, महेंद्र उबाळे,उत्तम जोगदंड , उपस्थित होते. प्रास्ताविकात शैलेश दोंदे यांनी, तरुणाई ही समाजपरिवर्तनाची मोठी ताकद आहे. शिव, बिरसा, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन वैचारिक व सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा. तरुणांच्या विचारांना आणि सर्जनशीलतेला विचारमंच मिळावे, यासाठी 'रेनी कार्निवल'चे आयोजन करण्यात आले आहे, असे सांगितले.

पहिल्या सत्रात 'आरक्षण पुनर्विचार विधेयक' या विषयावर संसद-संवाद आयोजित करण्यात आला. संकल्पना व संवादलेखन उत्तम जोगदंड यांनी केले, तर सभापती म्हणून कल्याण बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जगताप यांनी भूमिका बजावली. तर चळवळीची गाणी, अभिवाचन, नाट्य, कविता आणि एकपात्री सादरीकरण झाले. सूत्रसंचालन इंजि. रोहित जाधव यांनी केले. दुसऱ्या सत्रात 'भारतातील ढासळती शिक्षणव्यवस्था आणि जेन–झी आंदोलन' या विषयावर टॉक शो झाला. यामध्ये शीतल भंडारे, सुशांत इंगळे आणि प्रीतम भंडारे यांनी विविध मुद्द्यांवर विचार मांडले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला तसेच

ग्रामीण भागातून विविध स्तरातून आलेलं अनेक विद्यार्थी , युवक, युवती यांनी जेन झी टॉक शो मध्ये सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारण्याची संधी देण्यात आली. या सत्राचे सूत्रसंचालन इंजि. अक्षय भोईर यांनी केले. याच सत्रात 'आंबेडकरी विचारमूल्ये रुजविण्यासाठी सिनेमा व मीडिया या कलेचा वापर कसा करावा?' या विषयावर डॉ. सोमनाथ वाघमारे यांनी विचार मांडले. सूत्रसंचालन कवयित्री ॲड. सुरेखा पैठणे यांनी केले.

कार्यक्रमाचा समारोप कवी संमेलनाने झाला. प्रतीक पवार, सचिन डांगळे, स्नेहा कदम, राहुल तांबे, राजेश देवरुखकर आणि अक्षय भोईर यांनी विविध सामाजिक विषयांवर कविता सादर केल्या. सूत्रसंचालन प्रा. सोनाली जाधव यांनी केले. कार्यक्रमाला ठाणे जिल्ह्यासह मुंबईतील युवक–युवतींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. कविता, गाणी, समूहगीते, एकपात्री, समूह-संवाद, गटचर्चा आणि संसद-संवाद अशा विविध माध्यमांतून तरुणांनी आपले विचार मांडले. यावेळी डॉ. विकास उबाळे, अविनाश दोंदे, गणेश सोष्टे , रवींद्र चंदने , संजय इधे, राजेश देवरुखकर, गौतम सांगळे, ड. श्रीकांत कांबळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या प्रमाणात शहापूर मुरबाड तालुक्यामधले ग्रामीण भागातील विद्यार्थी युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित राहिले, त्यासाठी प्रवीण भालेराव यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेखा पैठणे, अक्षय भोईर, रोहित जाधव, ड. किशोर सावंत, सुरज खरे, प्रा. सोनाली अहिरे, ड. अंकित जाधव, कपिल जाधव, विशाल सोष्टे प्रा. वैभवी अडसुळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

# सराईत गुन्हेगार शरद कोळी यास एमपीडीए अंतर्गत येरवडा कारागृहात स्थानबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर पोलिसांनी चझऊ कायद्यान्वये कारवाई केली आहे. शरद विठ्ठल कोळी, रा. अर्धनारी, ता. मोहोळ, जि. सोलापूर यास स्थानबद्ध करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी दिल्यानंतर त्यास ताब्यात घेऊन येरवडा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल वि. कुलकर्णी यांनी जिल्ह्यात शरीराविरुद्ध तसेच मालमत्तेविरुद्ध वारंवार गुन्हे करणाऱ्या आणि सर्वसामान्य नागरिकांना उपद्रव निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. गुन्हेगारी कृत्यांना आळा बसावा, नागरिकांमध्ये शांतता व सुरक्षिततेचे वातावरण राहावे आणि सराईत गुन्हेगारांच्या कारवायांवर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी पोलिसांकडून अशा कारवाया सुरू आहेत.

९ गंभीर गुन्हे दाखल

पोलीस माहितीनुसार, शरद कोळी याच्यावर खुनाचा प्रयत्न, खंडणी मागणे, घातक हत्याराचा वापर करून इच्छापूर्वक दुखापत करणे, जबरी चोरी यांसह विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. पंढरपूर तालुका, सांगोला, कामती, मंगळवेढा आणि मंद्रुप पोलीस ठाण्यांच्या हद्दीत त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल असून, सोलापूर जिल्ह्याबाहेर नांदेड आणि जळगाव जिल्ह्यांतही गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

एकूण ९ गुन्हे त्याच्याविरुद्ध दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यापूर्वीही त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करत हद्दपारीची कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही पुन्हा गुन्हेगारी कृत्ये केल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

### सोलापूर ग्रामीण पोलिसांची प्रतिबंधात्मक कारवाई; सांगलीतून घेतले ताब्यात

शरद कोळीच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लवार यांनी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे चझऊ कायद्यान्वये स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर केला.

या प्रस्तावाची जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्तिकेयन यांनी पडताळणी केल्यानंतर शरद कोळी यास चझऊ कायद्यान्वये स्थानबद्ध करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले.

सांगलीतून ताब्यात

स्थानबद्धतेचे आदेश जारी झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांच्या पथकाने शरद कोळीचा शोध सुरू केला. पोलिसांनी त्याचा शोध घेत सांगली जिल्ह्यातून त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी त्यास पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर शरद कोळी यास पुढील स्थानबद्धतेसाठी येरवडा कारागृहात जमा करण्यात आले.

सराईत गुन्हेगारांवर पोलिसांचा वॉच

सोलापूर ग्रामीण पोलीस हद्दीत शरीराविरुद्ध व मालमत्तेविरुद्ध गुन्हे करणाऱ्या तसेच वाळू तस्करी, अवैध दारू विक्री यांसारख्या बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या सराईत गुन्हेगारांचे गुन्हेगारी अभिलेख तयार करण्यात आले आहेत. अशा गुन्हेगारांविरुद्ध यापुढेही चझऊ कायद्यान्वये प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिला आहे.



ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल वि. कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जगताप, पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लवार, सहायक पोलीस निरीक्षक विजय शिंदे तसेच स्थानिक गुन्हे शाखा आणि पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांनी कारवाईत सहभाग घेतला. जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडील उत्कर्ष देवकुळे, नायब तहसीलदार विलास म्हेत्रे यांनीही स्थानबद्धतेच्या प्रक्रियेत सहभाग घेतला.

सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून सराईत गुन्हेगारांविरुद्ध सुरू असलेल्या या प्रतिबंधात्मक कारवाईमुळे गुन्हेगारीला आळा घालण्याच्या पोलिसांच्या भूमिकेला अधिक बळ मिळाले आहे.

---

उगाव रस्त्यावर ४० हजारांची दारू जप्त; स्कुटीसह ७० हजारांचा मुद्देमाल ताब्यात

# स्कुटीवरून देशी दारूची वाहतूक; निफाड पोलिसांचा सापळा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यात अवैध दारूविक्री व वाहतुकीविरोधात निफाड पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असून, निफाड–उगाव मार्गावर स्कुटीवरून देशी दारूची वाहतूक करणाऱ्या इसमास सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत देशी दारूसाठ्यासह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली स्कुटी असा एकूण ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निफाड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, निफाड ते उगाव रस्त्याने एका स्कुटीवरून देशी दारूची अवैधरित्या वाहतूक केली जात आहे. ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अहिरराव यांनी संबंधित पोलीस अमलदारांना तातडीने माहिती देऊन कारवाईच्या सूचना दिल्या.

पोलिसांनी मिळालेल्या माहितीची गांभीर्याने दखल घेत संशयिताच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. त्यानंतर पोलीस पथकाने नियोजनपूर्वक सापळा रचून संशयितास दारूच्या मुद्देमालासह पकडण्याची कारवाई केली.

४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.४० वाजता छत्रपती शिवाजी हायस्कूलजवळील रस्त्यावर, उगाव (ता. निफाड, जि. नाशिक) येथे पोलिसांनी सापळा रचला. यावेळी संशयित अजय पाल सोहनलाल शर्मा (वय ५२ वर्षे, रा. गोकुळधाम, लासलगाव, ता. निफाड) हा राखाडी रंगाच्या टीव्हीएस ज्युपिटर स्कुटीवरून जात असताना पोलिसांनी त्यास थांबवून तपासणी केली.

तपासणीदरम्यान स्कुटीवर देशी दारूचा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी दारूचा साठा व वाहन ताब्यात घेतले.असुन

पोलिसांनी केलेल्या कारवाईत प्रिन्स संत्रा कंपनीचे लेबल असलेल्या ९० मिली क्षमतेच्या ८०० प्लास्टिकच्या बाटल्या आढळून आल्या. त्यांची एकूण किंमत ३२ हजार रुपये असल्याचे नोंदविण्यात आले आहे.

तसेच भिंगरी संत्रा कंपनीचे लेबल असलेल्या ९० मिली क्षमतेच्या २०० प्लास्टिकच्या बाटल्या आढळून आल्या. या दारूसाठ्याची किंमत ८ हजार रुपये आहे.

अशा प्रकारे पोलिसांनी एकूण १ हजार देशी दारूच्या बाटल्या, अंदाजे ४० हजार रुपये किमतीचा दारूसाठा, जप्त केला.

दारूची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली राखाडी रंगाची टीव्हीएस कंपनीची ज्युपिटर स्कुटी क्रमांक एमएच १५ केव्ही ७३४९ पोलिसांनी जप्त केली. या वाहनाची अंदाजे किंमत ३० हजार रुपये आहे.

त्यामुळे या कारवाईत ४० हजार रुपयांची देशी दारू आणि ३० हजार रुपयांची स्कुटी असा एकूण ७० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे

पोलीस नोंदीनुसार, आरोपी अजय शर्मा याने दुसऱ्या एका व्यक्तीकडून अवैध देशी दारूचा माल घेऊन तो विनापरवाना व बेकायदेशीररीत्या विक्री करण्याच्या उद्देशाने आपल्या ताब्यातील स्कुटीवरून वाहतूक केल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात चंद्रकांत पानसरे याचेही नाव आरोपी म्हणून नोंदविण्यात आले असून त्याचा पूर्ण पत्ता व इतर माहिती तपासातून समोर येणार आहे.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अरविंद शिवाजी ढवळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३२६/२०२६, महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (अ)(इ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे..




ही कारवाई पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस हवालदार कपालेश्वर ढिकले, पंढरीनाथ सानप, महिला पोलीस हवालदार सारिका जाधव, पोलीस कॉन्स्टेबल अरविंद ढवळे, सागर जाधव, धनंजय बैरागी, स्वप्निल शिरसाठ आणि विनोद जाधव यांनी सहभाग घेतला.

गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हवालदार जाधव यांनी केली असून, पुढील तपास पोलीस हवालदार ढेकळे करीत आहेत.

निफाड तालुक्यात अवैध दारूविक्री व वाहतुकीमुळे सामाजिक वातावरणावर होणारा परिणाम लक्षात घेता पोलिसांकडून अशा प्रकारच्या कारवायांवर विशेष लक्ष दिले जात आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अवैध दारू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पुढील तपास सुरू आहे.